
साप्ताहिक

# विवेक

वैशाख कृ. ५, ५११०, २५ मे २००८ / ८ रुपये

# अन्नासाठी दाही दिशा...



M.S. (ortho)
Reg. No. 52505
Chopade Accident Hospital
Akashwani Chowk, Jalgaon.
24181, 23232

## अंतरंग


संपादकीय ४

हसरे ठोसे ५

स्वातंत्र्यसंग्रामाची भव्य गाथा – क्रांतिचक्र १२

पुस्तकसृष्टी/ स्वातंत्र्यवीर सावरकर: एक चिंतन, पारंपरिक साहित्य आणि आधुनिक व्यवस्थापन तंत्र, चिरंतन तरंग २२-२३

सुनामी लाटा – महागाईच्या
सूर्यकांत परांजपे २४

कोकणच्या विकासाचा वेध घेणारा महोत्सव
राकेश खेडेकर २६

समृद्धीसाठी स्वागतोत्सुक चीन
देवेंद्र देवस्थळे २८

मनाच्या राष्ट्रीयीकरणासाठी चरित्रकोश उपयुक्त ठरतील ३२

भवरलालजी जैन पद्मश्रीने सन्मानित ३४

रूर्बन ३५

ज्ञानगंगा प्रकटली ३६

राजकारणातील कर्नाटकी कशिदा
संजीव उपरे ३८

रंजक माहिती
सिद्धी घरत ४२

असा असावा दिवाणखाना
डॉ. रविराज अहिरराव ३१

अनाठायी भीती
मीना शिलेदार ४०


### मुखपृष्ठ कथा
## अन्नासाठी दाही दिशा...!
सपना कदम



अन्नटंचाईचा सामना भारताला करावा लागत असल्याचे ऐकून कोणालाही आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. अर्जेंटिना किंवा झिम्बाब्वेप्रमाणे भारतात अजून उपासमारीमुळे दंगली, हिंसाचार यांसारखे प्रकार घडत नाहीत हे सुदैवच! तरीही अन्नपदार्थांच्या वाढत्या किमती आणि अन्नधान्याची टंचाई या नक्कीच चिंताजनक आहेत.

### *स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती विशेष*


*उद्गाता, स्वातंत्र्याचा, क्रांतीचा आणि समाजसुधारणांचा*
गिरीश दाबके १४

*अंदमान...*
विद्या रानडे १९



हंस: श्वेतो बक: श्वेत: को भेदो बकहंसयो: । नीरक्षीरविवेके तु हंसो हंसो बको बक: ।।

प्रबंध संपादक : दिलीप करंबेळकर
संपादक : रमेश पतंगे
कार्यकारी संपादक : श्रीपाद पटवारी
कार्यकारी संपादक (ई-विवेक) : किरण शेलार
मुख्य उपसंपादक : मकरंद मुळे
व्यवस्थापक : शहाजी जाधव

जाहिरात विभाग प्रमुख : अमोल पेडणेकर
मुखपृष्ठ : ॲडव्हाइस कम्युनिकेशन - २४७०४०१७
अक्षरजुळणी : आस्वाद प्रकाशन प्रा.लि.
वार्षिक वर्गणी : रु. ४००/- त्रैवार्षिक : रु. १,०५०/-
पंचवार्षिक : रु. १,७५०/- परदेशात : रु.२,४००/-
धनादेश किंवा ड्राफ्ट 'हिंदुस्थान प्रकाशन संस्था' या नावे काढावा.

प्रमुख विक्रेते :ओमसाई डिस्ट्रीब्युटर्स
✆ : ९२२४७७५१६१
संकेतस्थळ : www.evivek.com
Email :vivekwkl@rediffmail.com
vivekwkl@yahoo.com

किंमत : ८/- रु.

मुंबई कार्यालय : ५/१२, कामत औद्योगिक वसाहत, ३९६ स्वा. वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५ ✆ २४२२ १४४० फॅक्स : २४३६ ३७५६
प्रशासकीय कार्यालय द्वारा : हिंदुस्थान प्रकाशन संस्था, विवेक भवन (कृष्णा रिजन्सी), १२ वा मजला, प्लॉट क्र. ४०, सेक्टर क्र. ३०, सानपाडा (प.), नवी मुंबई - ४०० ७०५. ✆ २७८१०२३५/३६. फॅक्स : २७८१०२३७
पुणे विभागीय कार्यालय : वीरेंद्र हाईट्स, तिसरा मजला, ५५७, सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणे - ३० (वसंतदादा शेतकरी सह. बँकेच्यावर) ✆ २४४८१३९२

**व्यक्तिमत्त्व**

प्रतिनिधी

# भवरलालजी जैन पद्मश्रीने सन्मानित



राष्ट्रपती भवन दिल्ली येथील अशोका हॉलमध्ये भारत सरकारद्वारे दिले जाणारे प्रतिष्ठेचे पुरस्कार ५ मे रोजी प्रदान करण्यात आले. ११९ जणांपैकी पहिल्या टप्प्यात ६१ जणांना आज सन्मानित करण्यात आले. यात प्रामुख्याने सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले, प्रणव मुखर्जी, एव्हरेस्टवीर एडमंड हिलेरी (मरणोत्तर), 'इन्फोसिसचे' एन. आर. नारायणमूर्ती, पी. एस. आर. ओबेराय, सचिन तेंडुलकर यांच्यासह जळगाव येथील 'जैन इरिगेशन'चे संचालक डी. आर. मेहता आणि 'जैन इरिगेशन'चे संस्थापक अध्यक्ष, ज्येष्ठ विचारवंत भवरलालजी जैन यांचा समावेश आहे. भाऊंच्या रूपाने पद्मश्री मिळविणारे जळगाव जिल्ह्यातील ते पहिलेच गणमान्य व्यक्तिमत्त्व आहे. जैन इरिगेशन आणि उद्योगासाठी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जैन इरिगेशनच्या संचालक मंडळातील दोन संचालकांनी पहिल्यांदाच एकाच वेळी पद्म पुरस्काराचा स्वीकार केला आहे.

भारतातील यावर्षी विविध क्षेत्रांमध्ये कार्य करणाऱ्या एकूण ११९ जणांचा १३ पद्मविभूषण, ३५ पद्मभूषण आणि ७१ पद्मश्रीने सन्मान होत असून त्यातील १६ जण महाराष्ट्रातील आहेत. त्यात ज्येष्ठ विचारवंत आणि जैन उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष भवरलाल जैन यांना केंद्र सरकारतर्फे 'विज्ञान आणि अभियांत्रिकी'तील आपल्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल 'पद्मश्री' देण्यात आली.

''... आपणास मिळालेला पद्मश्री पुरस्कार हा शेतकऱ्यांचा सन्मान आहे. शेतकऱ्यांच्या जीवनस्तरात सुधारणा, पाण्याची बचत आणि उत्पादन वाढ, नाशवंत शेतमालाचे मूल्यवर्धन अशा समाजसेवेच्या भावनेने जैन उद्योग समूहाने वाटचाल केली आहे. आपल्या देशाच्या संस्कृतीचा शेती हा कणा आहे. मात्र अलीकडे तो दुर्बल होत आहे. कोरडवाहू शेतीची बागायती कशी होईल यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. भविष्यात आता शिक्षण आणि कोरडवाहू शेती या दोन क्षेत्रांत अभूतपूर्व कार्य करायचे आहे....'' अशी प्रतिक्रिया भवरलालजी जैन यांनी व्यक्त केली.

ठिबक सिंचन, फलोत्पादन, उतीसंवर्धन, फळ प्रक्रिया उद्योगाद्वारे कृषी क्षेत्रात क्रांती घडवून आणणाऱ्या संपूर्ण जिल्ह्यासोबतच भाऊंना आदराचे स्थान आहे. शेती व शेतकऱ्यांविषयी आयुष्यभर चिंतन, मनन आणि प्रत्यक्ष कृतीद्वारे कार्य करणारे भाऊ हे स्वत: भूमिपुत्र आहेत. कृषी व कृषी आधारित उद्योग विश्वात नवनवीन विक्रम त्यांनी प्रस्थापित केले. जेआयएसएलला आतापर्यंत निर्यात क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी, संशोधन व विकास क्षेत्रातील यश आणि उद्योजकता, फेअर ट्रेड प्रॅक्टिस यांसारख्या विविध कारणांसाठी ३४ राज्य पुरस्कार, ११३ राष्ट्रीय पुरस्कार आणि ४ आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. 'क्रॉफर्ड रीड मेमोरियल' हा आंतरराष्ट्रीय स्तरावरील अत्यंत मानाचा पुरस्कार इरिगेशन असोसिएशन यांच्यातर्फे दिला जातो. जेआयएसएलचे प्रमुख बी.एच. जैन यांना हा पुरस्कार 'अमेरिकेबाहेरील सिंचनक्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी'करिता देण्यात आला. इतकेच नव्हे तर २००६ मध्ये त्यांनी विविध विद्यापीठांच्या डॉक्टरेट पदव्यांची हॅट्ट्रिक साधली. प्रथम उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लेटर्स देऊन गौरविले. नंतर डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोलीने डीएस्सी देऊन गौरव केला तर राजस्थानच्या महाराणा प्रताप शेती व तंत्रज्ञान विद्यापीठ उदयपूर यांनीही डीएस्सी पदवीने अलंकृत केले आहे. साहित्य, कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्राच्या पाठीशी 'जैन चॅरिटीज'च्या माध्यमातून भाऊ व त्यांची चार मुले खंबीर उभी आहेत.

प्रस्तुत सोहळ्याला उपराष्ट्रपती, पंतप्रधान मनमोहन सिंग, केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील, गृहराज्य मंत्री, लोकसभा अध्यक्ष सोमनाथ चॅटर्जी, काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी, रेल्वे मंत्री लालूप्रसाद यादव यांच्यासह निवडक मंत्रीगणांची उपस्थिती होती. त्याचप्रमाणे या सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी भाऊंसह जैन परिवारातील चार पिढ्यांची म्हणजेच काका दलूभाऊ जैन, भाऊ कांतिलालजी जैन, मुलगा अशोक जैन आणि नातू अथांग जैन, स्नुषा सौ. ज्योती जैन, डॉ. सुभाष चौधरी, केळी तज्ज्ञ के. बी. पाटील यांचीही उपस्थिती होती.

पुरस्कारांचा मुकुटमणी ठरलेला व भारतातील प्रतिष्ठेचा समजला जाणारा 'पद्मश्री' पुरस्कार यामुळे जळगाव शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. साप्ताहिक 'विवेक' परिवारातर्फेही त्यांचे हार्दिक अभिनंदन!